# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक /अत्यंत महत्वाचे**
**कालमर्यादा**

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/२०१८/ १०४४
दिनांक : 24 AUG 2018

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित उमेदवारांचे नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र Upload करण्याबाबत...

**संदर्भ :-** या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/८४८ दिनांक ०२.०७.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, संचालनालयाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचा सुधारीत दिनांक निर्धारीत करण्यात आलेला आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा प्रवेशित राखीव प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न करता केवळ याबाबतच्या यंत्रणेकडे सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश निश्चित केलेला आहे, **अशा विद्यार्थ्यांनी संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या दिनांकापर्यंत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र प्रवेशित संस्थेतर्फे ऑनलाईन अपलोड करणे अत्यावश्यक आहे.**

संदर्भाधिन परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या दिनांकापर्यंत वरीलप्रमाणे यंत्रणेकडे सादर केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे ज्या राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित केलेले असतील अशा प्रकरणी संबंधित संस्थानी त्या विद्यार्थ्यांचे नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र संकेतस्थळावर तात्काळ अपलोड करावे. **विहीत केलेल्या दिनांकापर्यंत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल. ही बाब विचारात घेऊन विद्यार्थ्याने विहीत मुदतीत नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र संस्थेस सादर करूनही जर संस्थेने ते संदर्भिय परिपत्रक क्रमांक १ अन्वये अपलोड करावयाच्या अंतिम दिनांकापर्यंत अपलोड न केल्यास उद्भवणा-या प्रकरणांना संबंधित संस्था जबाबदार राहील,** याची प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.**

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

२. माहिती तंत्रज्ञान कक्ष, कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय,मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच त्यांना कळविण्यात येते की, संबंधित विद्यार्थ्यांनी सदर प्रमाणपत्र तात्काळ संस्थेमार्फत अपलोड करण्याबाबत SMS संदेश विद्यार्थ्यांना पाठविण्याची कार्यवाही करावी.

C:\Users\desk10\Desktop\Validity Upload within time limit circular.docx